निर्णय क्र. मविनिआ/माअपील/०२/२०२५/०१३१ दिनांक: १८.०२.२०२५

| | | |
|---|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २१.११.२०२४ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : | १८.१२.२०२४ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : | २१.०१.२०२५ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : | १८.०२.२०२५ |

**सक्षम प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत)**

**अपील क्र. ०२/२०२५**

श्री. सुनील कडू ... **अपीलकर्ता**

**विरुद्ध**

जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई ... **प्रतिवादि**

**आपीलाचे तथ्य:-**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.११.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दिनांक २१.११.२०२४ रोजी प्राप्त झाला. आपीलार्थी यांच्या दिनांक १८.११.२०२४ रोजी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८.१२.२०२४ रोजी चे पत्रांन्वये समाधानकारक माहिती न पुरवल्यामुळे आपीलार्थी यांनी दिनांक १८.०१.२०२५ रोजी त्याच माहितीसाठी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे अर्ज दाखल केले. (अर्ज प्रथम अपील आयोगाच्या कार्यालयास दिनांक २१.०१.२०२५ रोजी प्राप्त झाला).

प्रथम आपीलीय अधिकारी यांनी आपीलार्थी यांना दिनांक २१.०१.२०२५ रोजी नोटिस पाठवून दिनांक ३०.०१.२०२५ रोजी अर्जा वर सुनावणी आयोजीत केली होती. दिनांक ३०.०१.२०२५ रोजी सुनावणी साठी आपीलार्थी हजर झाले नाहीत तथा सुनावणीची तारीख/वेळ बदलून देण्याची कुठलीही विनंती आपीलार्थी कडून प्राप्त झालेली नाही. परंतु, श्री. सुनील शि. वाघ हे आपीलार्थी यांचे प्रतिनिधी म्हणून सुनावणी साठी हजर झाले. सुनावणी दरम्यान श्री. सुनील शि. वाघ यांनी आपीलार्थी श्री सुनील कडू यांच्या तर्फे हजर राहण्याचे अधिकार पत्र




१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

सादर केले. जन माहिती अधिकारी सुनावणी साठी हजर झाले. श्री. सुनील शि. वाघ व जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान मौखिक निवेदन सादर केले. सुनावणी दरम्यान आपीलार्थी यांना लेखी युक्तीवाद सादर करण्यास सूचना दिल्या असता त्यांनी दिनांक ११.०२.२०२५ (दिनांक १४.०२.२०२५ रोजी प्राप्त झालेल्या) पत्रान्वये लेखी युक्तीवाद सदर केला.

**अपीलातील निवेदवारून आपिलातील मुद्दे खालील प्रमाणे आहे:-**

**मागीतलेली माहिती :**

1. Provide attested copy of the notes by which Mr. Prafulla Varhade getting salary of Executive Director. However, is he is holding post of Director (EE).
2. Provide the total sum of rupees paid to him as Executive Director.
3. Provide sanction notification of Executive Director by the Govt. of Maharashtra.
4. Provide details of vehicles expenses and Allowances and per day Kilo Metre of office car provide, him by the Commission.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:**

For Point no. 1, 2 & 4 :

As per the Section 8 (1)(j) of the Right to Information Act (RTI) 2005, information which relates to personal information and disclosure of which has no relationship to any public activity or interest, is shall not be given to the citizen.

The Government of Maharashtra has also stated in the General Administration Department, Government Circular क्र. संकीर्ण २०१२/९८९/प्र क्र ४७९/सहा, दि. १७.१०.२०१४ माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (त्र) मधील तरतुदीनुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषतः त्रयस्थ पक्षाबरोबर, उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदाराला देण्यात येऊ नये.

Considering the above, the information sought by you are in the category of personal information and hence cannot be given under the RTI.

For Point no. 3:

The details of sanctioned strength are available in MERC (Recruitment and Conditions of Service of Employees) Regulations 2024. The said Regulations is available on www.merc.gov.in in downloadable format.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण:**

आपीलार्थी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली कारणे खालील प्रमाणे:

i. I state that the PIO misconstrued the provisions of RTI Act, 2005 and denied the information sought by the Applicant.

ii. The information sought by the Applicant is not a personal information.

iii. The PIO wrongly interpreted the Section of 8(1)(j) of the RTI Act, 2005.

iv. As per the Section 2(f) definition of "information" provides below-

"Information means any material in any form, including records, documents, memos, e-mails, opinions, advices, press releases, circulars, orders, logbooks, contracts, reports, papers, samples, models, data material held in any electronic form and information relating to any private body which can be accessed by a public authority under any other law for the time being in force.

Thus, on the above definition, the PIO ought to provide information sought in application at para (i) to (iv) of the application.

v. The PIO provided false, misleading and incomplete information, as the information sought in para (i) to (iv) it is not personal information.

vi. As per the meaning of "Information" the logbook is public information and not personal, so this information ought to be provided by the PIO.

vii. The PIO denied the Public Information as well as the PIO failed to provide such all information, and denied it under the guise of Section 8(1)(j).

viii. The PIO is unaware of the definition of Section 2(j) "Right to Information" which stated as under-

(j) "Right to Information" means the right to information accessible under this Act which is held by or under the control of any public authority and includes the right to –

1. Inspection of work, documents, records;
2. Taking notes, extracts or certified copies of documents or records,
3. Taking certified samples of material
4. Obtaining information in the form of diskette, floppies, tapes, video cassettes or in any other electronic mode or through printouts where such information stored in a computer or in any other device.

From the above, it is clear that taking notes is right to information.

ix. The PIO did not dispose the request of the Applicant as per Section 7 of the RTI Act, 2005.

x. The information sought by the Applicant is not exempted as per the Section 8 of the RTI Act, the PIO given false information needs to pay fine and provide information free of cost of information to the Applicant.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे:**

सदर अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी श्री प्रफुल्ल वऱ्हाडे यांच्या कार्यकारी संचालक पदाची वेतनश्रेणी मान्य करण्यात आलेली कागदपत्राची प्रत शिवाय, त्यांना कार्यकारी संचालक पदाच्या अनुषंगाने दिलेली एकूण रक्कम, महाराष्ट्र शासनाकडून कार्यकारी संचालकाची अधिसूचनेची प्रत आणि आयोगाकडून देण्यात आलेल्या वाहन खर्चाची आणि भत्त्याची आणि प्रति दिन प्रति किलोमीटर ची माहिती ची प्रत मिळण्यासाठी मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहिती नुसार मुद्दा क्र १,२ व ४ च्या अनुषंगाने सदर अर्जातील माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (त्र) मध्ये मोडत असल्यामुळे आणि सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या दिनांक १७.१०.२०१४ च्या परिपत्रकानुसार वरील माहिती लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषतः त्रयस्थ पक्षाबरोबर, उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागितलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदाराला देण्यात येऊ नये या बाबींचा आधार घेऊन नाकारली आहे. मुद्दा क्र ३ बाबत सदर माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उतरून घेण्याच्या स्वरूपात उपलब्ध आहे असे कळविले आहे.

वरील विषयानुसार सदर प्रकरणाचा अभ्यास केला असता आणि सुनावणीदरम्यानच्या मौखिक व लिखित स्वरूपात सादर केलेल्या युक्तिवादाच्या आधारे असे निरीक्षण नोंदवले आहे की अपीलकर्त्याने वरील अर्जात मागितलेली माहिती तृतीय पक्षाच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित आहे. त्यामुळे ज्याच्या प्रकटीकरणाचा कोणत्याही मोठ्या सार्वजनिक हिताशी काहीही संबंध नाही आणि त्यामुळे तृतीय पक्षाच्या गोपनीयतेवर अनावधानाने आक्रमण होईल, हे लक्षात घेता, विविध प्रकरणांमध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणांचा उल्लेख केलेला आहे, ज्यामध्ये "वैयक्तिक माहिती" चा पैलू अत्यंत संरचित पद्धतीने स्पष्ट केला गेला आहे. या संदर्भात, माननीय सर्वोच्च न्यायालयाने कॅनरा बँक विरुद्ध सी.एस. श्याम या प्रकरणात मांडलेला गुणोत्तर लक्षात घेता येईल शिवाय, गिरीश रामचंद्र विरुद्ध केंद्रीय माहिती आयुक्त आणि इतर, (२०१३) १ एससीसी २१२ आणि आर.के. जैन विरुद्ध भारतीय संघ आणि इतर, (२०१३) शिवाय माननीय सर्वोच्च न्यायालय विरुद्ध सुभाष चंद्र अगरवाल दिवाणी अपील क्र. १००४४ (२०१९) मधील दिलेल्या निर्णयातील मुद्यांच्या अनुषंगाने असे स्पष्ठ करण्यात आलेले आहे की वैयक्तिक नोंदी, ज्यामध्ये नाव, पत्ता, शारीरिक, मानसिक आणि मानसिक स्थिती, मिळालेले गुण, ग्रेड आणि उत्तरपत्रिका यांचा समावेश आहे, हे सर्व वैयक्तिक माहिती म्हणून मानले जाते. त्याचप्रमाणे, व्यावसायिक नोंदी, ज्यामध्ये पात्रता, कामगिरी, मूल्यांकन अहवाल, एसीआर, शिस्तभंगाची कार्यवाही इत्यादींचा समावेश आहे, ही सर्व

वैयक्तिक माहिती आहे. वैद्यकीय नोंदी, उपचार, औषधांची निवड, भेट दिलेल्या रुग्णालये आणि डॉक्टरांची यादी, कुटुंबातील सदस्यांसह नोंदवलेले निष्कर्ष, मालमत्ता, दायित्वे, आयकर परतावा, गुंतवणुकीचे तपशील, कर्ज देणे आणि कर्ज घेणे इत्यादींशी संबंधित माहिती वैयक्तिक माहिती आहे.

केंद्रीय माहिती आयोग यांनी पी कन्नन विरुद्ध जन माहिती अधिकारी पोर्ट ब्लेअर यांच्या दिनांक २९.०१.२०२० रोजी दिलेल्या निर्णयाचा आधार घेऊन असे निष्कर्ष लावता येईल की जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर कायद्याच्या तरतुदींशी सुसंगत असल्याचे दिसून येत आहे आणि त्यात कोणतीही कमतरता आढळून येत नाही. त्यामुळे या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी वैयक्तिक माहिती च्या अनुसरून दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने कोणताही हस्तक्षेप करण्याची आवश्यकता वाटत नाही.

त्यानुसार, वरील माहिती आधारे सदर अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम आपीलीय अधिकारी यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०००३२ येथे अपील दाखल करू शकता.**

<u>निर्णय</u>

अपील नामंजूर करून निकाली काढण्यात येत आहे.

(अभिजीत वि. चाटुफळे)
**सह संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रती,
श्री. सुनील कडू
३/३ डॉक्टर वीर्स वाडी, (काळेवाडी)
जी. डी. आंबेकर मार्ग, परेल,
मुंबई – ४०००३३.

(अभिजीत वि. चाटुफळे)
**सह संचालक (प्रशासन व वित्त) तथा प्रथम आपीलीय अधिकारी**

प्रत,
जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई